


Title Code- MAHMAR-51647

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784
Email- jansanchlan@gmail.com

वर्ष ३ रे | अंक : २९२ वा | मंगळवार दि. २१ जानेवारी २०२५ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# जिल्हा रुग्णालयात भ्रष्टाचाराचा महापूर.. किती तरी मोकाट भस्मासुर!

# भस्म्या वीजतंत्री अंभोरे यांनी काय केला कारनामा?

## तपास यंत्रणेचे ध्यान किधर है ? डेपोटेशन कोणाच्या सोईचे ?

**जनसंचलन/ बुलढाणा**

जिल्हा सामान्य रुग्णालयात कोट्यावधींचा भ्रष्टाचार झालाय! सरकारी तिजोरीवर डल्ला मारणारे अनेक भस्मासुर मोकाट असले तरी, अशा भ्रष्टाचाऱ्यांना जेरबंद करण्यासाठी आम्ही पाठपुरावा करणे सोडणार नाही! नवल मात्र इतकेच की,तपास यंत्रणा याकडे दुर्लक्ष का करीत आहे? असा आरोप होतोय!पात्रता नसताना, भस्म्या वीजतंत्री अंभोरे याने प्रचंड भ्रष्टाचार केलाय. आरोग्य उपसंचालक यांनी थातूरमातूर कारवाईचे पत्र जारी केले तरी, या भ्रष्ट अंभोरेवर कारवाईसाठी समिती गठीत करावी,एसीबी कडे तपास द्यावा आणि त्याची चल-अचल संपत्ती जप्त करण्यात यावी, अशी मागणी एका तक्रारदाराने केली आहे.विशेष म्हणजे प्रभारी जिल्हा शल्यचिकित्सक आताही पात्रता नसलेल्या या वीजतंत्रीला स्टाफ नसल्याचे कारण पुढे करून त्याला कार्यरत ठेवल्याचे कारण सांगताहेत. दरम्यान अधिकृत कर्मचारी रुजू करता येत नाहीत काय? की,केवळ मर्जीतील कंत्राटी ठेवून मलिदा लाटायचा?असाही प्रश्न निर्माण झालाय. बुलडाणा सामान्य रुग्णालय येथील झालेल्या गैरव्यवहारात दोषी असलेल्या कर्मचा-यावर कार्यवाही करण्याची मागणी करण्यात येत आहे.भ्रष्ट एस.एल.अंभोरे, विजतंत्री याकडे सामान्यरुग्णालयात२१-०५-२०१८तेडीसेंबर २०२० या कालावधीमध्ये कंत्राटी सेवेचा कार्यभार असंताना त्याने कंत्राटीवस्त्रधुलाईसेवा(?)केली.मात्रहीसेवा करताना त्याच्या दरामध्ये प्रंचड तफावत होती व अवाजवी दराने सदरची देयके अदा करण्यात आली आणि कंत्राटी स्वच्छता सेवा घेत असतांना सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडून जागेचे मोजमाप करुन ई-निविदा करणे अपेक्षीत असतांना मोघम स्वरुपात ई-निविदा करुन देयके अदा करण्यात आली आहे.तसेच उच्च स्तरीय समितीची मान्यता न घेता अवैधरीत्या घेण्यात आलेल्या कंत्राटी वाहनचालक यांचे सुध्दा देयके अदा करण्यात आली. तसेच सक्षम प्राधिकारी तथा उपसंचालक यांचे मान्यतेआधी व मान्यतेशिवाय पुरवठा आदेश किंवा करारनामे करण्यात आले. तसेच सामान्य रुग्णालय, खामगाव करीता वस्त्रधुलाईचे दर निविदाधारकाने भरलेले नसतांना सुध्दा दरमहा रु ९८००० इतक्या दराने कंत्राट देण्यात आले. कंत्राटी स्वरुपाची देयके अदा होतांना कंत्राटदार यांनी त्यांचे कंत्राटी कर्मचारी यांना नियमानुसार किमान वेतन, त्यांचे ईएसआयसी, पोपीएफ ईत्यादी वजाती केल्या किंवा नाही याबाबत पडताळणी करणे आवश्यक असतांना तसे करण्यात आले नाही, तसेच कार्यालयीन फर्निचर, कुलर्स, मोटर्स, बेड, रुग्णांलयीन साहीत्य हे महारष्ट्र लघु उद्योग महामंडळाकडुन खरेदीसाठी राखीव ठेवण्यात आलेले असतांना स्थानिकरित्या खरेदी करण्यात आली.दरम्यान वरिष्ठांनी अंतिम अहवाल सादर केला असुन अंभोरेला अशंता दोषी ठरविण्यात आले आहे. कामकाजामध्ये, कर्तव्यामध्ये कसुर केल्याबाबत सक्त ताकीद देण्यात यावी व त्याची नोदं त्यांच्या मुळ सेवा पुस्तकामध्ये तांबडया शाहीने घेण्यातयावी.असेनिर्देशडॉ.कमलेशआरभंडारी ,उपसंचालक, आरोग्य सेवा, अकोला यांनी दिले आहेत.परंतु या गैरव्यवहारात अनेक मासे आहेत. परंतु तपास यंत्रणा ढिम्म असल्याने ते उजळ माथ्याने फिरत आहेत. परिणामी भ्रष्ट अंभोरेवर कारवाईसाठी समिती गठीत करावी,एसीबी कडे तपास द्यावा आणि त्याची चल-अचल संपत्ती जप्त करण्यात यावी, अशी मागणी एका तक्रारदाराने केली आहे.




जिल्हा सामान्य रुग्णालय भ्रष्टाचार प्रकरणात सामील असलेले तेथील काही अधिकारी,कर्मचारी व कंत्राटदार यांची पुराव्याणीशी मिळालेली बरीचशी माहितीचा उलगडा आम्ही लवकरच बातमीपत्रातून बाहेर काढून त्यांच्यावर जो पर्यंत कारवाई होऊन केलेल्या भ्रष्टाचारातून कमावलेली करोडो रुपयांची संपत्ती व्याजासह शासनाच्या तिजोरीत जमा होत नाही आमचा पाठपुरावा असाच सुरू राहणार

अजून बरेच काही पुढील भागात...

# द बर्निंग गॅरेज! तब्बल १०-१२ चारचाकी वाहनांसह १०-१५ लाखांचे स्पेअर पार्ट्स आगीच्या भक्ष्यस्थानी!

**जनसंचलन/मलकापूर**

मलकापूरच्या बुलढाणा रोडवरील सानिया कार गॅरेजमध्ये आज पहाटे ५ वाजता भीषण आग लागली. या आगीत दुरुस्तीसाठी आलेल्या १०-१२ चारचाकी वाहनांसह १०-१५ लाखांचे स्पेअर पार्ट्स जळून खाक झाले. प्राथमिक अंदाजानुसार, लाखोंच्या घरात आर्थिक नुकसान झाल्याचे समोर आले आहे. सूत्रांनुसार, गॅरेजमध्ये उभी असलेल्या स्विफ्ट डिझायर गाडीला अचानक आग लागली. काही क्षणांतच आगीने रौद्र रूप धारण करून इतर वाहनांनाही आपल्या कवेत घेतले. लाखोंचे महागडे स्पेअर पार्ट्सही जळून भस्मसात झाले. घटनेची माहिती मिळताच स्थानिकांनी अग्निशमन दलाला पाचारण केले. चालक वासुदेव भोपळे आणि अग्निशमन दलाने तीन तासांच्या शर्तीच्या प्रयत्नांनंतर आगीवर नियंत्रण मिळवले. सुदैवाने जीवितहानी झाली नाही,मात्र गॅरेजमधील वाहनांचा आणि सामग्रीचा राख होत लाखोंचा फटका बसला आहे. आगीचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.



दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# भुमीहीन शेतकऱ्यांचा लाँग मार्च सरकारच्या नाकर्तेपणाचा निषेध

## भुमीहीन शेतकऱ्यांचा लाँग मार्च निघाला आता मुंबई मंत्रालयच्या दिशेने...

जनसंचलन/बुलढाणा

भुमीहीन आणि वंचित शेतकऱ्यांनी आपल्या हक्काच्या जमिनींसाठी लाँग मार्चचे आयोजन केले आहे. अनेक वर्षांपासून शासनाच्या ई-क्लास आणि वनजमिनी कसत असलेल्या या शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे शासन दुर्लक्ष करत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. शासन निर्णय असतानाही महसूल अधिकाऱ्यांच्या लाल फितीमुळे जमीनपट्ट्यांच्या फाईली प्रलंबित राहिल्या आहेत. भारतीय समता संघटनेचे अध्यक्ष आम्रपाल वाघमारे यांनी सांगितले की, शेतकऱ्यांच्या हक्काच्या जमिनी सौर प्रकल्पांसाठी हस्तांतरित करण्याचे षडयंत्र रचले जात आहे, जे सामाजिक अन्याय आहे. भुमीहीनांच्या ताब्यातील जमिनीवर प्रकल्प लावल्यास त्यांना भिकेची वेळ येईल. या मागण्यांसाठी बुलढाणा, अकोला, वाशिम, अमरावती, परभणीसह इतर जिल्ह्यांतील शेतकरी सहभागी होणार आहेत.





माजी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी २०२२-२०२३ च्या हिवाळी अधिवेशनात शेतकऱ्यांना ताब्यातील जमीन पट्ट्याने देण्याची घोषणा केली होती. मात्र, त्याची अंमलबजावणी अद्याप झालेली नाही, असा सवाल माजी जिल्हा सदस्य नरहरी गवई यांनी उपस्थित केला आहे. शेतकऱ्यांनी लाँग मार्चद्वारे सरकारकडे आपल्या न्याय्य हक्कांसाठी ठोस निर्णय घेण्याची मागणी केली आहे. भुमीहीन आणि वंचित शेतकऱ्यांनी आपल्या हक्काच्या जमिनींसाठी लाँग मार्चचे आयोजन केले आहे. अनेक वर्षांपासून शासनाच्या ई-क्लास आणि वनजमिनी कसत असलेल्या या शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे शासन दुर्लक्ष करत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. शासन निर्णय असतानाही महसूल अधिकाऱ्यांच्या लाल फितीमुळे जमीनपट्ट्यांच्या फाईली प्रलंबित राहिल्या आहेत. भारतीय समता संघटनेचे अध्यक्ष आम्रपाल वाघमारे यांनी सांगितले की, शेतकऱ्यांच्या हक्काच्या जमिनी सौर प्रकल्पांसाठी हस्तांतरित करण्याचे षडयंत्र रचले जात आहे, जे सामाजिक अन्याय आहे. भुमीहीनांच्या ताब्यातील जमिनीवर प्रकल्प लावल्यास त्यांना भिकेची वेळ येईल. या मागण्यांसाठी बुलढाणा, अकोला, वाशिम, अमरावती, परभणीसह इतर जिल्ह्यांतील शेतकरी सहभागी होणार आहेत. शेतकऱ्यांनी लाँग मार्चद्वारे सरकारकडे आपल्या न्याय्य हक्कांसाठी ठोस निर्णय घेण्याची मागणी केली आहे.

# महिलेसह ४ आरोपींना एलसीबीने ठोकल्या बेड्या!



जनसंचलन/सिंदखेडराजा

लोणार येथील दर्शन ज्वेलर्सचे मालक आदित्य संचेती यांना अडवून त्यांच्या जवळील तब्बल २८,३१,००० किमतीच्या सोन्या चांदीचे दागिने लुटणाऱ्या बीड येथील २ संशयित गुन्हेगारांना एलसीबीने अटक केल्याची बातमी हॅलो बुलढाणाने आज प्रसारित केली होती.या प्रकरणात आणखी एक अपडेट पुढे आली आहे. या गुन्ह्यातील चोरीचे दागिने सिंदखेड राजा येथे ४ जणांनी विकले आहे.यात एका महिलेचा समावेश असून चारही आरोपींना अटक करण्यात आली आहे. बीड येथून संशयित आरोपीला ताब्यात घेतल्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तपास चक्र फिरवले असता,स्नेहल ज्वेलर्स सराफा दुकान सिंदखेड राजा येथे चोरीचा गुन्हा उघडकीस आला.सदर प्रकरणी गुन्ह्यात चोरी गेलेल्या सोन्या-चांदीच्या दागिन्यांची विक्री केल्याची कबुली आरोपीने दिली असून मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. मच्छिंद्र जालिंदर गवते वय २९ वर्ष रा. बेलोर ता. जि. बीड,गंगाराम धोंडीराम रोकडे वय ३६ वर्ष रा. तलवाडा गेवराई जि. बीड, शिवशंकर महादेव खंदारकर वय ३० वर्ष रा. तांबोळा ता. लोणार, सौ. अनुराधा अण्णा वाळेकर वय ४५ वर्ष रा. सिंदखेड राजा अशी आरोपींची नावे आहेत.ही कारवाई एसपी विश्व पानसरे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अशोक लांडे यांच्या नेतृत्वातील पथकाने केली.या कारवाई पथकामध्ये एपीआय यशोदा कणसे, पीएसआय प्रताप बजाड, पीएसआय बालाजी सानप, (सि.राजा),शरद गिरी,पुरुषोत्तम आघाव, गजानन गोराले ,दिपक वायाळ, विक्की इंगळे, मंगेश सनगाळे, भारत जाधव, विकास राऊत,पुजा साळवे,विलास भोसले,हेलगे राजू आडवे, कैलास ठोंबरे, ऋषिकेश खंडेराव यांचा समावेश आहे.

# सराफाला लुटणाऱ्या २ लुटेऱ्यांना बीडमधून उचलले!

## एलसीबीची जिगरबाज कारवाई!

जनसंचलन/बुलढाणा

दर्शन ज्वेलर्सचे मालक आदित्य संचेती यांना अडवून त्यांच्या जवळील तब्बल २८,३१,००० किंमतीचे सोन्या-चांदीचे दाग दागिने लुटणाऱ्या २ संशयित गुन्हेगारांना एलसीबीने बेड्या ठोकल्या आहेत. जिल्हा पोलीस अधीक्षक विश्व पानसरे यांच्या मार्गदर्शनात एलसीबीचे पोलीस निरीक्षक अशोक लांडे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने व लोणार पोलिसांनी गुप्त माहितीवरून आरोपींना बीडमधून उचलले. आरोपींनी सोने चांदीचे दागिने बीड येथील सोनारस विक्री केल्याची कबुली दिल्याने मुद्देमाल हस्तगत करत समांतर तपास करण्यात येत आहे. आरोपी ऋषिकेश बबन बेद्रे वय २८ वर्ष, रा. बेलोरा ता. जि. बीड,अशोक




फुलचंद शिंगणे वय ३२ वर्ष रा. नागपूर ता.जि. बीड यांना अटक करण्यात आली असून,श्रावण गणपत पवार रा. राजुरी बु. ता.जि. बीड हा फरार आहे. यांनी केली कार्यवाही पीएसआय प्रताप बजाड,शरद गिरी, पुरूषोतम आघाव,गजानन गोराले,दिपक वायाळ,विलास भोसले,तसेच स्था.गु.शा.चे राजू आडवे,कैलास खंडेराव यांनी केली आहे.

# रहेमत अली शाह यांची विभागीय संघटक पदी निवड

जनसंचलन/बुलढाणा

पत्रकारीतेच्या माध्यमातून अन्यायाच्या विरोधात आवाज उठवला पाहिजे हा निर्णय मनाशी बांधून रणजीतसिंग राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली पत्रकारीतेचं व्रत हाती घेतलं. जिल्ह्यातील एका सायंदैनिकाचे शहर प्रतिनिधी म्हणून पत्रकारितेला सुरुवात केली असून आज एका वृत्तपत्रात जिल्हा प्रतिनिधी म्हणून काम पाहत आहे. त्यांना पत्रकारितेचा गेल्या ११ वर्षाचा अनुभव आहे. राजकारण, सामाजिक, सांस्कृतिक, व्यापार, कृषी, शैक्षणिक व पर्यावरण क्षेत्रात काम करणाऱ्या मान्यवर मंडळीशी कौटुंबिक जिव्हाळ्याचे संबंध जोपासात आपल्या कामाचा ठसा उमटविला. याच कार्याची दखल घेऊन जिल्हा पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष रणजीतसिंग राजपूत यांनी विभागीय संघटक पदी रहेमत अली शाह यांची निवड केली आहे.



त्यांच्या या निवडीबद्दल विविध स्तरांतून त्यांचे कौतुक होत आहे. त्यांनी निवडीनंतर प्रतिक्रिया देतांना सांगितले की, जिल्हा पत्रकार संघाने जो विश्वास आपल्यावर दाखवला आहे, त्याबद्दल मी जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष यांनी जो विश्वास माझ्यावर टाकला त्याचे मी पूर्णपणे विश्वास सार्थक करुन संघटनेचे विभागीय विस्तारासाठी जोमाने कामाला सुरुवात करणार असल्याचे प्रतिपादन रहेमत अली यांनी व्यक्त केले.

# शैक्षणिक गुणवत्ता संमेलन परिषद; शिक्षकांनी त्यागी वृत्तीने ज्ञानदान करुन विद्यार्थी घडवावा




जनसंचलन/बुलढाणा

शासकिय सेवेत, शिक्षण कार्यात शिक्षकांचे कर्तव्य करताना त्याला उद्योग धंदा म्हणून जीवनात स्थान देऊ नका. त्यागी वृत्तीने ज्ञानदान देऊन विद्यार्थी घडवा, असे प्रतिपादन मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात यांनी केले. बुलढाणा जिल्हा परिषद व शिक्षण विभागाच्यावतीने जिल्ह्यातील शाळा, विद्यार्थी व शैक्षणिक क्षेत्रातील संबंधीत घटकांचा सर्वांगीण विकास व्हावा, या हेतूने शैक्षणिक गुणवत्ता संमेलनाचे आयोजन दि. १७ जानेवारी रोजी सहकार विद्या मंदिर बुलढाणा येथील सभागृहात करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी प्रकाश राठोड, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जे.ओ.भटकर, अधिव्याख्याता समाधान डुकरे, उपशिक्षणाधिकारी उमेश जैन, अनिल देवकर व पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पुजन करुन मान्यवरांच्या हस्ते अभिवादन करण्यात आले. त्यानंतर जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेमार्फत समाधान डुकरे यांनी अभ्यास शैलीनुसार पुस्तक निर्मीत अंतर्गत प्रेरणादायी शाळा सृजन लेखमाला, शिक्षणानंद आणि समावित शिक्षणातून दिव्यांगांचा विकास व्हावा या चार पुस्तकांचे प्रकाशन मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. तसेच शिक्षण क्षेत्राअंतर्गत जिल्हास्तरीय नवउपक्रम स्पर्धा २०२४-२५ मध्ये शिक्षकांना प्राथमिक शिक्षक गटातुन डॉ. फकिरा राजगुरु, विजय मोंढे, नागसेन साबळे, स्मिता कोल्हे, उर्मिला शेळके व उत्तेजनार्थ शेख मतिन शेख नजिर, अंजली क्षिरसागर व माध्यमिक गटातुन शदर देशपांडे, डॉ.फिरोज खान इब्राहिम खान, जनार्धन मेहेत्रे, प्रविण क्षिरसागर, सुवर्णा नंदकिशोर कुळकर्णी, उत्तेजनार्थ संजयसिंह तोमर यांना पारितोषीक वितरण करण्यात आले. जिल्हा परिषद व ओपन लिंक फाऊंडेशन यांच्यातील सामजस्य करार अंतर्गत आचार्य विनोबा भावे सहाय्यक कार्यक्रम अर्थात विनोबा ॲपच्या माध्यमातुन जिल्ह्यातील उपक्रमाशिल शिक्षकांना प्रत्येक महिण्यात प्रोत्साहनपर पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. त्यानंतर सुगम पाठशाळा अंतर्गत जिल्ह्यांतील १४ शाळेतील संगित शिक्षक, विद्यार्थी, व्यवस्थापान समितीचे अध्यक्ष व गटशिक्षणाधिकारी यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या हस्ते हार्मोनियम आणि तबला या संगित साहित्याचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिक्षणाधिकारी (प्राथ.) बाळासाहेब खरात यांनी तर सुत्रसंचालन अरविंद शिंगाडे व आभार प्रदर्शन अंजली नेटके यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षण विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# सलमानकडे केश संजीवनी? बुलढाण्यातील टक्कल बधितांसाठी कोल्हापुरात उपाय!

जनसंचलन/बुलढाणा

शेगाव तालुक्यातील टक्कल बाधितांचे प्रकरण राज्यभर चर्चेत आले असून, कोल्हापूर मध्ये एका सलमान नावाच्या पठ्याने केस गळतीवर उपाय शोधला आहे. शेकडो टक्कल बाधितांना हा पठ्ठ्या मोफत जडीबुटी औषध देत असून पुन्हा केस उगवण्याचा दावा करीत आहे. बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव तालुक्यातील तब्बल १२ गावांमध्ये आतापर्यंत २०३ टक्कल बाधित रुग्ण आढळून आले आहे. पाण्यातील क्षार व नायट्रेट मुळे हा प्रकार घडल्याचे सूत्र सांगत आहेत. दरम्यान या बाधितांसाठी कोल्हापुरात यावर उपाय सापडल्याची बातमी धडकत आहे.परंतु हॅलो बुलढाणा या औषधोपचाराची व परिणामांची पुष्टी करत नाही. कोल्हापूर येथील महावीर गार्डन मध्ये अनेक टक्कल बाधितांची गर्दी होत आहे. जवळपास ६०० ते ७०० लोक इथे उपचार घेण्यासाठी दिसून येत आहेत.केस गळतीवर उपायाचा दावा करणारा सलमान छातीठोकपणे जडीबुडीच्या औषधाने केस उगवण्याचा दावा करीत आहे. बुलढाण्यातील टक्कल प्रकरणावरही तो प्रसार माध्यमांशी बोलला. तो म्हणाला की,पाच वेळा ट्रीटमेंट करावी लागते. जडीबुटीची औषध आहे.साईड इफेक्ट नाहीत. केस गळण्याचे कारण विचारले असता सलमान म्हणाला की, केसाचा एक व्हायरस असला की हा व्हायरस संपूर्ण डोक्यावरचे केस नष्ट करतो परंतु माझ्याकडे मोफत इलाज आहे.या आणि उपचार करा असे आवाहनही त्याने केलं आहे.

# शेगांव तालुक्यातील अवसायनातील आठ संस्थांची नोंदणी रद्द होणार

## आक्षेप नोंदविण्याचे सहायक निबंधकाचे आवाहन


जनसंचलन/शेगाव

शेगांव तालुक्यातील आठ सहकारी संस्थाची नोंदणी रद्द करण्याची कार्यवाही सहायक निबंधक सहकारी संस्थाव्दारे करण्यात येत आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६१ चे नियम ८९(४) नुसार अवसायनातील संस्थाशी ज्या कोण्या व्यक्ती वा संस्थेविरुद्ध काही दावे असल्यास त्यांनी जाहिर सूचना प्रसिद्ध झाल्यचे तारखेपासून दोन महिन्याचे आत नोंदवावे लागणार आहे. त्यानंतर दाव्यांची दखल घेतली जाणार नाही, असे शेगांव सहकारी संस्थाचे सहायक निबंधक विशाल दाते यांनी कळविले आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०२ नुसार सहकारी संस्था अंतिम अवसायनात घेण्यात अलेल्या अहेत. या संस्थावर अवसायकाची नियुक्ती यापुर्वीच करण्यात आलेली आहे. यापुढील दाखल केलेल्या दाव्याचे अनुषंगाने कोणत्याही दावा दाखल न झाल्यास त्यांनतर आठ संस्थांची नोंदणी रद्द करण्यात येईल, यांची नोंद घ्यावी.

# मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त २७ जानेवारीला ग्रंथप्रदर्शनी

जनसंचलन/बुलढाणा

मराठी भाषेचा प्रचार व प्रसार व्हावा तसेच मराठी भाषेचे संवर्धन व्हावे याकरीता मराठी भाषा विभागाच्या धोरणानुसार दरवर्षी दि. १४ ते २८ जानेवारी या कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यात येतो. पंधरवडानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा येथे दि. २७ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ११ वाजता ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. ग्रंथप्रदर्शनीसोबतच स्थानिक पुस्तक विक्रेते, प्रकाशक यांचेकडून बुक स्टॉल लावण्यात येणार असून त्यामुळे वाचकांना आपल्या आवडत्या ग्रंथांची खरेदी करता येणार आहे. या ग्रंथ प्रदर्शनीला जिल्ह्यातील सर्व शासकीय अधिकारी, कर्मचारी, शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थी तसेच ग्रंथप्रेमी व वाचकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा ग्रंथालय अधिकारी सुनिल पाटील यांनी केले आहे.



# बुलढाण्याच्या एका प्रकरणात हायकोर्ट म्हणाले..
# लग्न करण्यास नकार दिला म्हणजे आत्महत्या करण्यास प्रवृत्त करणे नव्हे!

जनसंचलन/बुलडाणा

मुंबई हायकोर्टाच्या नागपूर खंडपीठाने बुलढाणा येथील एका प्रकरणात सुनावणी करताना एक महत्वाचे निरीक्षण नोंदवले आहे. केवळ लग्न करण्यास नकार दिला म्हणजे आत्महत्या करण्यास प्रवृत्त करणे असा होत नाही, असे नागपूर खंडपीठाने म्हटले आहे. एखाद्या व्यक्तीने एखाद्या महिलेशी लग्न करण्यास नकार दिल्याने त्याला आत्महत्येस प्रवृत्त करण्याच्या गुन्ह्यात दोषी ठरवता येणार नाही, असे मुंबई हायकोर्टाच्या नागपूर खंडपीठाने सुनावणीदरम्यान सांगितले. नागपूर खंडपीठामध्ये खटल्यासंदर्भात सुनावणी सुरू होती. ३ डिसेंबर २०२० मधील महाराष्ट्राच्या बुलढाणा जिल्ह्यातील एका तरुणीने गळफास




घेऊन आपले जीवन संपवले होते. पीडित तरुणीचे ९ वर्ष एका तरूणाशी प्रेमसंबंध होते. मात्र तीच्या मृत्यूनंतर आरोपीने तीच्या मुळशी असलेले नाते तोडून माझ्या मुलीला जीव देण्यास प्रवृत्त केले अशी तक्रार पीडित तरुणीच्या वडिलांनी दाखल केली होती. दरम्यान यावर सुनावणी करताना आरोपीने या तरुणीला कोणतीही धमकी किंवा तीला त्रास दिल्याचे पुरावे नसल्याचे समोर आले. त्यामुळे या आरोपीने पीडित तरुणीस जीवन संपवण्यासाठी प्रवृत्त केले असे कुठेही दिसून आले नाही असे कोर्टाने निकाल देताना म्हटले आहे. याउलट त्या दोघांचे संबंध तुटल्यानंतर ती तरुणी आरोपीच्या संपर्कात असल्याचे दिसून आले. म्हणून केवळ लग्न करण्यास नकार दिला याकहा अर्थ आत्महत्या करण्यास प्रवृत्त करणे असा होत नाही, असे मुंबई हायकोर्टाच्या नागपूर खंडपीठाने म्हटले आहे.

# मराठी साहित्य अभिवाचन स्पर्धेत अक्षरदेह प्रथम!

जनसंचलन/बुलढाणा

रंगगंध कलासक्त न्यास चाळीसगावतर्फे आयोजित मराठी साहित्य अभिवाचन स्पर्धेच्या विभागनिहाय प्राथमिक फेरीत येथील अक्षरदेह नाट्यकला केंद्राचा संघ प्रथम आला असून चाळीसगाव येथे होणाऱ्या अंतीम फेरीसाठी सदर संघाची निवड झाली आहे. चिखली येथील बाळासाहेब देवरस विद्यालयाच्या सभागृहात १९ जानेवारी रोजी सदर स्पर्धा घेण्यात आली. मागील २२ वर्षांपासून मराठी साहित्य संवर्धनासाठी रंगगंध कलासक्त न्यास चाळीसगाव यांच्यातर्फे पुरुषोत्तम दारव्हेकर स्मृती मराठी साहित्य अभिवाचन स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. यंदा विनोदी साहित्य नर्मविनोद ते खळखळाट आणि प्रवासवर्णन या विषयावरील साहित्याचे अभिवाचन स्पर्धेसाठी ठेवण्यात आले होते. चिखली येथील भवताल थिएटरला विभागीय प्राथमिक फेरीचा मान प्राप्त झाला होता. एकूण १४ संघांनी यामध्ये सहभाग घेतला होता. स्पर्धेत बुलढाणा येथील अक्षरदेह नाट्यकला संस्थेतर्फे नाट्यकर्मी शशिकांत इंगळे व कु. सांची इंगळे यांनी सादर केलेल्या स्वलिखित पद्मपाणी या प्रवासवर्णनाला सांघिक प्रथम क्रमांक जाहिर करण्यात आला असून येत्या २२ व २३ फेब्रुवारी रोजी चाळीसगाव येथे होणाऱ्या अंतीम फेरीसाठी निवड करण्यात आली आहे. केंद्रप्रमुख तथा भवताल थिएटरचे संचालक विनय शुक्ल यांनी हा निकाल जाहीर केला. स्पर्धेचे परीक्षण सुप्रसिद्ध साहित्यिक प्रा. डॉ. अनंत शिरसाट व सिने अभिनेते गणेश देशमुख यांनी केले. स्पर्धेला भवताल थिएटरचे सारंग महाजन, प्रकाश कुलकर्णी, सौ. गौरी ठोसर, डॉ. विजया पानगोळे, डॉ. भारत पानगोळे, सौ. सारीका शुक्ल यांच्यासह नाट्यरसिक व साहित्यिक बहुसंख्येने उपस्थित होते.

# तालुका प्रमुख रामदास चौथनकर यांचा राजीनामा शिवसेनेत खळबळ!



जनसंचलन/मोताळा

तालुक्यातील शिवसेनेच्या संघटनेला मोठा धक्का बसला आहे. तालुका प्रमुख तथा माजी पंचायत समिती सदस्य रामदास भगवान चौथनकर यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. त्यांनी जिल्हाप्रमुख ओमसिंगभाऊ राजपूत यांच्याकडे राजीनामा सादर करत वैयक्तिक व घरगुती कारणांमुळे संघटनेला वेळ देता येत नसल्याचे सांगितले आहे. गेल्या अडीच वर्षांपासून तालुका प्रमुख म्हणून कार्यरत असलेल्या चौथनकरांनी संघटनेच्या विस्तारात महत्वपूर्ण भूमिका बजावली होती. त्यांच्या राजीनाम्यानंतर संघटनेच्या स्थानिक कार्यकर्त्यांमध्ये नाराजीची भावना निर्माण झाली आहे. चौथनकरांनी राजीनाम्यानंतरही शिवसैनिक म्हणून कार्यरत राहणार असल्याचे स्पष्ट केले असले, तरी या घटनेमुळे मोताळा तालुक्यातील शिवसेनेच्या राजकीय हालचालींवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. तालुका प्रमुखपदाच्या राजीनाम्यामुळे पुढील नेतृत्वाची निवड कोण होणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# गुरुदेव श्री श्री रविशंकर यांच्यासोबत भूमिपुत्र ना.प्रतापराव जाधव यांचा संवाद: भारतीय परंपरेच्या शाश्वत ज्ञानावर भर

जनसंचलन/बुलढाणा

भारतीय योग व अध्यात्माचे जगभरात प्रसार करणारे गुरुदेव श्री श्री रविशंकर आणि केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांची ऐतिहासिक भेट संपन्न झाली. या संवादामध्ये योग, ध्यान आणि भारतीय परंपरेच्या शाश्वत ज्ञानावर सखोल चर्चा करण्यात आली. गुरुदेवांनी योग व ध्यानाच्या माध्यमातून शारीरिक व मानसिक आरोग्य कसे प्राप्त करता येईल, यावर मार्गदर्शन केले. केंद्रीय मंत्री जाधव यांनी आयुष मंत्रालयाच्या माध्यमातून भारतीय परंपरेचा जागतिक स्तरावर प्रचार व प्रसार करण्यासाठी घेतलेली पावले मांडली. या भेटीत भारतीय जीवनपद्धतीचे महत्व, योगाची विज्ञानाधिष्ठित



मांडणी आणि त्याचे आरोग्यदायी परिणाम यावर भर देण्यात आला. केंद्रीय आयुष्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी या प्रयत्नांना प्रोत्साहन देण्याचा निर्धार व्यक्त केला. भारतीय परंपरा, संस्कृती आणि ध्यानाचा जागतिक आरोग्य क्षेत्रावर होणारा प्रभाव यावर केंद्रबिंदू ठेवून ही भेट ऐतिहासिक ठरली आहे. या चर्चेने भारतीय ज्ञानप्रवाहाला नवी दिशा मिळाल्याचे जाणकारांचे मत आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे
दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958